**विशेष दिवाणी दावा क्र.२११/२०२२**
[ CNR : MHWR020024212022]
**दिलीप –वि– राजु व इतर**

## नि.१५ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसुल करुन मिळण्याकरिता व मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केलेला आहे. प्रकरणाच्या योग्य निर्णयासाठी व न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.२, ३ व ४ चे म्हणणे अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, माझ्या मते, प्रतिवादी क्र.२, ३ व ४ यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे गरजेचे आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र.२, ३ व ४ विरुध्द पारीत करण्यात आलेला दि.२०.०३.२०२३ रोजीचा 'विना कैफियत आदेश' रद्द करण्यात येतो.

Digitally signed by PRATIBHA TUSHAR SHEJWAL KALE
Date: 2023.04.29 17:06:43 +0530

( श्रीमती प्र. तु. शेजवळ – काळे )
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वर्धा.

दिनांकः २९.०४.२०२३